वाचा-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८ /आरोग्य-५ दि.१४.०३.२०२०.

२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे खंड २,३ व ४

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य -५ दि.१४ मार्च,२०२०

**विषयः-** राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करण्याबाबत. (कार्यालयात बैठका व अभ्यांगतांच्या भेटी नियंत्रीत करणे बाबत)

जा.क्र.२०२०/आरबी-१/डे-२/टे-४/सीआर.
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
दि.१६.०३.२०२०

**परिपत्रक**

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

त्यामुळे साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संदर्भात नमुद अधिसुचना दिनांक १४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे, त्या आधारे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी सर्व कार्यालय प्रमुख यांनी दि.३१.०३.२०२० पर्यंत कार्यालयात केवळ अति तातडीच्याच बैठका घ्याव्यात व अभ्यांगतांच्या भेटी नियंत्रीत करण्यासाठी त्यांचे स्तरावरुन आवश्यक ते उपायोजना कराव्यात. जसे, अभ्यांगतांना त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी Whatsapp क्रमांक उपलब्ध करुन द्यावा व अभ्यांगतांनी उक्त Whatsapp क्रमांक व कार्यालयीन इमेल-आयडी तसेच कार्यालयीन दुरध्वनी क्रमांकावर त्यांच्या अडचणी मांडणेबाबतचे सुचना फलक कार्यालयाच्या दर्शनी भागात लावावा.

(डॉ. विपीन इटनकर)
**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

**प्रति,**

सर्व कार्यालय प्रमुख, -----------------------

Scanned by CamScanner